महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग,जि.रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,लिमये वाडी, अलिबाग.जि.रायगड – ४०२ २०१
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, ALIBAG –RAIGAD
DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, ALIBAG BEACH ROAD, LIMYEWADI, ALIBAG DIST.RAIGAD – 402 201
Email- deangmcalibag@gmail.com Phone No. ०२१४१-२९९२१४ www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/सुक्ष्मजीवशास्त्र Dengue Antigen Kit /दरपत्रक मागणी/ 2986 /२०२५ दिनांक. 28 .०७. २०२५

दरपत्रक मागणी पत्र.
प्रति________,
__________

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड या संस्थेच्या सुक्ष्मजीवशास्त्र विभाग रुग्णसेवेकरिता लागणारे अत्यावश्यक Dengue NS-1 Antigen ELISA Kits खरेदी करणेबाबतदरपत्रके मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग-रायगड या संस्थेतील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाकरीता Dengue NS-1 Antigen ELISA Kits ची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने खालील नमुन्यात मोहरबंद लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्ती नुसार सादर करावेत.

| Sr. No. | Consumable Name | Quantity | Rate Per Test | Total Amont (Including Taxes and All) |
|---|---|---|---|---|
| 1 | **Dengue NS-1 Antigen ELISA Kits** | 50 Test Kits | | |

अ.नं.

१. दरपत्रक मोहरबंद लिफाफा, दि. 31/०७/२०२५ रोजी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारत घेतले जाणार नाही / ग्राहय धरले जाणार नाही.

२. दरपत्रक मोहोरबंद लिफाफा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग.जि. रायगड यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहबंद लिफाफयावर "Dengue NS-1 Antigen ELISA Kits" असे दरपत्रक लिहुन सादर करावे.

३. लिफाफयावर डाव्या बाजूस दरपत्रक क्र. लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रकदारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रक ग्राहय कालावधी हा पुरवठा आदेश नोंदविलेल्या दिनांका पासुन सहा (०६) महिन्यांचा राहील.

५. प्रस्तावित उदिदष्टांकरिता दरपत्रक आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

६. सदर उदिदष्टांची किंमत, सर्व करांसहीत एकुण किंमत अशी दर्शविण्यात यावी. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

७. दरपत्रक माहोरबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज (Documents) अधिकृत लेटर हेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना, २) व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, ३)जी.एस.टी. क्रमांक पत्र. ४) पॅनकार्ड क्रमांक, ५) मागील ३ वर्षाचे सदर बाबी पुरवठा केल्याबाबतचे पूरवठा आदेश.

८. सदर "Dengue NS-1 Antigen ELISA Kits" हे इतर कोणत्या ही शासकीय संस्थेस पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.

९. ज्या पात्र दरपत्रक धारकाचे दर हे न्यूनतम असतील अशा यशस्वी दरपत्रक धारकास आवश्यकते नुसार बाबींचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

१०. पुरवठा करण्यात आलेल्या बाबींचा दर्जा हा उत्तम/गुणवत्तापुर्ण असावा.

११. "Dengue NS-1 Antigen ELISA Kits" चा पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार "Dengue NS-1 Antigen ELISA Kits" चा पुरवठा ०७ दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील. विहित मुदतीत पुरवठा न केल्यास व्दितीय न्युनतम दरपत्रदारकास (L2) पुरवठा आदेश देण्यचात येतील.

१२. अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे तसेच कोणतेही स्तरावर खरेदी प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखून ठेवले आहेत.

१३. काम पुर्ण झाल्यानंतर तीन प्रतीत देयके अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग जि. रायगड यांचे नावाने देण्यात यावेत. (With Revenue Stump)

१४. देयकाची अदायगी ही शासनाकडून अनुदान प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येईल. देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारचे विलंब शुक्ल अदा केले जाणार नाही.

१५. वरील नमूद वस्तुंची नग संख्या ही मा. अधिष्ठाता यांच्या आदेशान्वये /प्रशासकीय उपलब्धतेनुसार कमी किंवा वाढवली जाऊ शकते.

१६. पुरवठा धारकाचे पूर्ण नाव, भ्रमणध्वनी आणि संपूर्ण पत्ता, सांकेतांक क्र.(Email address along with Website) हा Envelope वर नमूद असणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अलिबाग रायगड

प्रत - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या सुचना फलकावर दरपत्रक मागविण्या संदर्भात दिनांक :- २४/०७/२०२५ सुचना देण्यात आल्या आहेत.